**प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषि विकास योजना अंतर्गत प्रति थेंब अधिक पीक (सूक्ष्म सिंचन) या योजनेस सन २०२६-२७ करिता मंजूर ₹४७७२८.३३०७ लाख इतक्या वार्षिक कृति आराखड्यास प्रशासकीय मान्यता देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभाग**

**शासन निर्णय क्र. राकृवि-०४२६/प्र.क्र.४४ (१६५०८९६)/१४-अे**

मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ०८ मे, २०२६

**संदर्भ :** १. केंद्र शासनाचे पत्र क्र.१-१५/२०२६-RKVY-१९८,यांचे पत्र दिनांक २२.०४.२०२६.
२. संचालक फलोत्पादन, कृषी आयुक्तालय, पुणे यांचे पत्र दिनांक २२.०४.२०२६
३. संचालक फलोत्पादन, कृषी आयुक्तालय, पुणे यांचे पत्र दिनांक २८.०४.२०२६

**प्रस्तावना :**

सन २०१५-१६ पासून प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत प्रति थेंब अधिक पीक (सूक्ष्म सिंचन) घटकाची अंमलबजावणी राज्यात करण्यात येत आहे.

केंद्र शासनाच्या दिनांक ०६ एप्रिल, २०२२ रोजीच्या पत्रान्वये राष्ट्रीय कृषि विकास योजना-रफ्तार ची राष्ट्रीय कृषि विकास योजना-कॅफेटेरिया या नावाने पुनर्ररचना केली असून त्यामध्ये वार्षिक कृती आराखडा आधारित व सविस्तर प्रकल्प अहवाल आधारित या दोन शाखांचा समावेश आहे. प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषि विकास योजनेतील प्रति थेंब अधिक पीक (सूक्ष्म सिंचन) हा घटक प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषि विकास योजना वार्षिक कृती आराखडा आधारित शाखेत अंतर्भूत केला असून केंद्र व राज्य हिश्श्याच्या निधीचे प्रमाण ६०:४० असे आहे.

संदर्भीय क्र. १ येथील दिनांक २२.०४.२०२६ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनाच्या प्रकल्प अंमलबजावणी समितीने प्रति थेंब अधिक पीक (सूक्ष्म सिंचन) योजनेकरिता सन २०२६-२७ मध्ये एकूण ₹४७७२८.३३०७ लाख (केंद्र हिस्सा ₹२८६३७.०० लाख आणि राज्य हिस्सा ₹१९०९१.३३०७ लाख) इतक्या वार्षिक कृती आराखड्यास मान्यता दिली आहे.

त्यानुसार, प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत प्रति थेंब अधिक पीक (सूक्ष्म सिंचन) घटकाच्या सन २०२६-२७ साठी ९२२०१ (हे.) क्षेत्र व ९६०४४ लाभार्थ्यांकरिता एकूण

₹४७७२८.३३०७ लाख (केंद्र हिस्सा ₹२८६३७.०० लाख आणि राज्य हिस्सा ₹१९०९१.३३०७ लाख) निधीच्या वार्षिक कृती आराखड्यास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

१. सन २०२६-२७ मध्ये प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषि विकास योजना अंतर्गत प्रति थेंब अधिक पीक (सूक्ष्म सिंचन) योजनेची राज्यात अंमलबजावणी करण्यासाठी ९२२०१ (हे.) क्षेत्र व ९६०४४ लाभार्थ्यांकरिता एकूण ₹४७७२८.३३०७ लाख (केंद्र हिस्सा ₹२८६३७.०० लाख आणि राज्य हिस्सा ₹१९०९१.३३०७ लाख) निधीच्या वार्षिक कृती आराखड्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. त्याचा सविस्तर तपशिल खालीलप्रमाणे आहे. **(रु.लाखात)**

| अ. क्र. | बाब | भौतिक कार्यक्रम (हे.)/संख्या | | आर्थिक कार्यक्रम (रु. लाख) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | क्षेत्र (हे.) | लाभधारक संख्या | **केंद्र हिस्सा** | **राज्य हिस्सा** | **एकूण** |
| १. | सुक्ष्म सिंचन | ९२२०१ | ९६०४४ | २७९२१.०८ | १८६१४.०५ | ४६५३५.१३ |
| २. | प्रशासकीय तरतूद २.५ टक्के | | | ७१५.९२ | ४७७.२८ | ११९३.२० |
| एकूण | | ९२२०१ | ९६०४४ | २८६३७.०० | १९०९१.३३ | ४७७२८.३३ |

उक्त तक्त्यातील मंजूर रकमेच्या अनुषंगाने प्रवर्गनिहाय तपशिल खालीलप्रमाणे आहे. **(रु.लाखात)**

| | **केंद्र हिस्सा (६०%)** | **राज्य हिस्सा (४०%)** | **एकूण** |
|---|---|---|---|
| **सर्वसाधारण प्रवर्ग** | २२५६५.९५६ | १५०४३.९७०७ | **३७६०९.९२६७** |
| **अनुसूचित जाती** | ३३७९.१६६ | २२५२.७७ | **५६३१.९३६** |
| **अनुसूचित जमाती** | २६९१.८७८ | १७९४.५९ | **४४८६.४६८** |
| **एकूण..** | **२८६३७.००** | **१९०९१.३३०७** | **४७७२८.३३०७** |

२. या योजनेंतर्गत वितरित करण्यात येणारा निधी केंद्र हिस्सा व राज्य हिश्याच्या पुढील लेखाशिर्षांतर्गत सन २०२६-२७ मध्ये अर्थसंकल्पित केलेल्या तरतुदींतून खर्च करण्यात यावा.

| सर्वसाधारण प्रवर्ग | |
|---|---|
| **केंद्र हिस्सा** | **राज्य हिस्सा** |
| मागणी क्र. डी-३<br>२४०१ पीक संवर्धन<br>११३, कृषि अभियांत्रिकी<br>(००) (०७) प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना-प्रति<br>थेंब अधिक पीक (सुक्ष्म सिंचन) (कें.पु.यो.) (केंद्र<br>हिस्सा ६० टक्के) (सर्वसाधारण) (कार्यक्रम)<br>(२४०१ २५०४),<br>३३, अर्थसहाय्य | मागणी क्र. डी-३<br>२४०१ पीक संवर्धन<br>११३, कृषि अभियांत्रिकी<br>(००) (२१) प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना-प्रति थेंब अधिक पीक (सुक्ष्म सिंचन) (कें.पु.यो.) (राज्य हिस्सा ४० टक्के) (सर्वसाधारण) (कार्यक्रम)<br>(२४०१ ए९९६),<br>३३, अर्थसहाय्य |
| **अनुसूचित जाती प्रवर्ग** | |
| **केंद्र हिस्सा** | **राज्य हिस्सा** |
| मागणी क्र. एन-३<br>२४०१ पीक संवर्धन<br>७८९ - अनुसूचित जातींसाठी विशेष घटक योजना<br>(०१) अनुसूचित जाती घटक कार्यक्रमांतर्गत योजना<br>(०१) (२१) प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना प्रति<br>थेंब अधिक पीक (सुक्ष्म सिंचन) (कें.पु.यो.) (केंद्र<br>हिस्सा ६०%) (कार्यक्रम)<br>(२४०१ B२८६),<br>३३, अर्थसहाय्य | मागणी क्र. एन-३<br>२४०१ पीक संवर्धन<br>७८९ - अनुसूचित जातींसाठी विशेष घटक योजना<br>(०१) अनुसूचित जाती घटक कार्यक्रमांतर्गत योजना<br>(०१) (२२) प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना प्रति<br>थेंब अधिक पीक (सुक्ष्म सिंचन) (कें.पु.यो.) (राज्य<br>हिस्सा ४०%) (कार्यक्रम)<br>(२४०१ B२९५),<br>३३, अर्थसहाय्य |
| **अनुसूचित जमाती प्रवर्ग** | |
| **केंद्र हिस्सा** | **राज्य हिस्सा** |
| मागणी क्र. टी-५<br>२४०१ पीक संवर्धन<br>(००) (७९६) जनजाती क्षेत्र उपयोजना<br>(०१) जनजाती क्षेत्र उपयोजना | मागणी क्र. टी-५<br>२४०१ पीक संवर्धन<br>(००) (७९६) जनजाती क्षेत्र उपयोजना<br>(०१) जनजाती क्षेत्र उपयोजना<br>(०१) (१२) प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना प्रति |

| | |
|---|---|
| (०१) (२७) प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना प्रति<br>थेंब अधिक पीक (सुक्ष्म सिंचन) (केंद्र पुरस्कृत योजना) (केंद्र हिस्सा ६० टक्के) (जनजातीक्षेत्र उपयोजना) (कार्यक्रम)<br>(२४०१ A६१९),<br>३३, अर्थसहाय्य | थेंब अधिक पीक (केंपुयो) (केंद्र हिस्सा ४० टक्के) (कार्यक्रम)<br>(२४०१ A४६८),<br>३३, अर्थसहाय्य |

३. या योजनेंतर्गत वितरीत निधीचे वितरण करण्याकरिता आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे यांना नियंत्रण अधिकारी व सहाय्यक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. या योजनेंतर्गत वितरीत करण्यात आलेला निधी खर्च करताना प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषि विकास योजना अंतर्गत प्रति थेंब अधिक पीक (सूक्ष्म सिंचन) योजनेच्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

५. लाभार्थ्यांना अनुदान वाटप करताना शासनाद्वारे वेळोवेळी विहीत केल्या जाणाऱ्या मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करण्यात यावा. सदर योजनेच्या लाभार्थ्यांची निवड महा-डीबीटी प्रणालीद्वारे करण्यात यावी व लाभार्थ्यांना अनुदानाचे वाटप आधार संलग्न बँक खात्यावर करण्याकरिता सार्वजनिक वित्त व्यवस्थापन प्रणालीचा वापर करावा.

६. या योजनेंतर्गत वितरीत निधीच्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र केंद्र शासनास पाठवून त्याची प्रत राज्य शासनास पाठवावी.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६०५०८१८२३१३७३०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

GANPAT SANDIPAN KACHARE

Digitally signed by GANPAT SANDIPAN KACHARE
DN: CN = GANPAT SANDIPAN KACHARE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = Agri and Adf dept
Date: 2026.05.08 18:25:03 +05'30'

**(ग.सं. कचरे)**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.

२) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.

३) मा. उपमुख्यमंत्री (नगरविकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम)), महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन, राज्य उत्पादन शुल्क), महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा. मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मा. राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७) मा. विरोधी पक्षनेता विधानसभा/ विधान परिषद, विधान भवन, मुंबई.
८) सर्व मा. संसद सदस्य/महाराष्ट्र विधानसभा सदस्य /महाराष्ट्र विधानपरिषद सदस्य
९) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.
१०) अपर मुख्य सचिव (नियोजन) यांचे स्वीय सहायक, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) अपर मुख्य सचिव (वित्त) यांचे स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक
१३) सचिव, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक
१४) आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१५) संचालक, माहिती तंत्रज्ञान, मंत्रालय, मुंबई.
१६) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई.
१७) महालेखापाल महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर.
१८) महालेखापाल महाराष्ट्र (लेखा परिक्षा) मुंबई/नागपूर.
१९) वित्त विभाग (व्यय- १/अर्थसंकल्प १३), मंत्रालय, मुंबई.
२०) नियोजन विभाग (का-१४३१), मंत्रालय, मुंबई.
२१) सर्व उप सचिव / अवर सचिव / कक्ष अधिकारी, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
२२) सर्व संचालक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२३) निवडनस्ती (१४-अे कार्यासन) कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई